## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०५/२०१८

**१) विवाहीतेचा शारीरीक व मानसीक छळ करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद:—**

मगील २ वर्षा पासुन ते दिनांक २४/०५/२०१८ पर्यंत यातील फिर्यादीचा भासरा आरोपी क्र २ मागील २ वर्षा पुर्वी हा गावात जादु टोणा करतो या कारणा वरून गावातील लोंकानी त्याला मारपीट केली तर आरोपी क्र. २ याने फिर्यादीनेच माझी बदनामी केली असे बोलुन फिर्यादीस अश्लिल शब्दात बोलुन फिर्यादीस लज्जा वाटेल अशा उद्देशाने शिवीगाळ केली व आरोपी क्र. १ व ३ यांना विश्वासात घेवुन फिर्यादीचा नेहमी छळ करून घरगुती क्षुल्लक कारणा वरून भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ व मारपीट करून शारीरीक व मानसिक छळ केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४९८(अ),५०९,३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) संगनमत करून बांधकामाचे साहीत्य व दोन मोटार सायकलची चोरी:—**

दिनांक २४/०५/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून सुरू असलेल्या पुलीयाचे बांधकामा वरून चौकीदार व इतर कुनालाही न सांगता ६ एसीसी सिंमेटच्या पोतळया मोटार सायकलवर मांडुन चोरून नेतांनी मिळुन आले त्यांचे पासुन ६ एसीसी ४३ ग्रेड आर एसएस मार्क असलेल्या सिंमेट पोतळया ज्यावर सिम/एल—२०५७८४७ असे लिहलेले कि. २४,००/रु. १ एचएस डिलक्स मोटार सायकल क्र. एमएच ३६ वाय ६६८६ कि. ४०,०००/रु. ,१ हिरो ग्लॅमर लाल काळया रंगाची बिना नंबरची मोटार सायकल चेसीस क्र. एमबीएलजेएएस ०१०५९ डी ००१९८ कि. ६५,०००/रु. ची असा एकुण १,०७,४००/रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मडामे स्थागुशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मटाले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) पैश्याचे कारणा वरून दगडाने कपाळावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २३/०५/२०१८ चे १८.३० ते १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अशोक टिकाराम खंडाईत वय ४० वर्ष रा. सावरबंध हा त्याचे स्वत:चे मिनीडोअर क्र. एमएच ३६/३५६२ वर लाखांदुर फाटा येथुन अरवींद मेश्राम रा. कुभंली यांचे घरचे १ पुरूष ५ महिला असे पाहुने घेवुन त्याचे घरा समोर सोडले व पाहुण्यानी ठरवलेली ६० /रु. गाडी भाडे मागितले त्या प्रवाश्यांनी १०/रु. दिले तेंव्हा फिर्यादीने एवढे पैसे का दिले असे बोलले असता अरवींद मेश्राम याचे घरी आलेला पाहुना आरोपी संतोष ईलमकर यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून ढकलुन रोडावर पाडले व रस्त्यावरून दगड उचलुन कपाळावर मारले व उजव्या हाताचे कोप—याला चावा घेवुन नाकवर बुक्की मारले औषधोपचारा करीता उपजिल्हा रूग्नालय साकोली येथे भरती असुन जखमीचे बायान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) शेतातील विदयुत वायर चॅनल बोर्ड व पाईप जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक १५/०५/२०१८ चे २२.०० ते २३.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे शेतातील धुरे पेटवुन आग न विजविता तसेच सोडुन दिले त्याने आग सोडुन दिल्यास ती आग कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहचेल असे माहीत असुन सुध्दा बेदराकरपणे वागुन फिर्यादीचे शेतातील विदयुत वायर चॅनल बोर्ड व पाईप जाळुन नुकसान केल्याने फिर्यादी श्रीमती सत्यशिला दामोधर वाघाये वय ७० वर्ष रा. लाखोरी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) अनोळखी इसमाचे प्रेत पडलेल्या अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :—**

दिनांक २४/०५/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील ग्राम कवळसी येथील पुरनदास श्रीराम राखडे वय ४० वर्ष रा. कवळसी हा त्याचे शेतातील मोटार पंपाचा पाणी सरू करण्या करीता गेला असता, त्याला नारायण वनवे यांच्या शेतातील आंब्याचे झाडाखाली एक अनोळखी प्रेत पडलेले दिसल्याने, गावचे पोलीस पाटील यांना सांगितल्याने पोलीस पाटील शंकर बाबरे यांनी स्वत: घटनास्थळी जावुन पाहणी केली असता एक अनोळखी इसमाचे प्रेत नारायण वनवे यांच्या आंब्याच्या झाडाखाली पडलेले असुन त्याबाबत गावात व शेजारील गावात माहीती घेतली असता त्या अनोळखी मृतक इसमाबाबत कोणत्याच प्रकारची माहीती मिळुन न आल्याने फिर्यादी शंकर गणपत बाभरे वय ५५ वर्ष रा. कवडसी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शेंडे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) नवजात शिशु मुलीचा मृत्यु. :—**

दिनांक १७/०५/२०१८ चे २२.१५ वाजता दरम्यान यातील नवजात शिशु मुलगी हिची प्रकृती बिघडल्याने तिला औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे नेले असता, तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मस्के यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**७) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

**अ)** दिनांक २४/०५/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा खापा गोंदियाकडे जसणारा डांबरी रोड वर रोडवर येणाऱ्या —जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. माहुर्ले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**ब)** दिनांक २४/०५/२०१८ चे २०.०० ते २०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील ऑटो वाहन हा सार्वजनीक रोडवर येणाऱ्या —जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. बावणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत

**८) अवैध हातभट्टी /देशी /विदेशी दारु/ जुगार अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक २४/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, करडी सिहोरा, आंधळगाव, गोबरवाही ,लाखनी, पालांदुर, साकोली , पवनी, लाखांदुर व दिघोरी येथे हातभट्टी, देशी, विदेशी दारू/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १९५ लिटर हातभट्टी + ९३० किलो सडवा मोहा + सहीत्य + १ मोटार सायकल किंमती १,१८,३५०/—रु. व १२१ लिटर ३२०देशी/ विदेशी दारू + १ कार + मोबाईल कि. १,१२,०१०/रु. तसेच जुगारातुन किंमती ७३७/—रु. असा एकुण किंमती /—रु. २,३१,०९७/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २४/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता— ०६ ईतर वाहनांवरती — १०६ केसेस करण्यात आले आहे.

25/5/18

**(डी.डब्ल्यु मंडलवार)**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**दुरध्वनी क्र.८८८८९६०५६०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.